**On the occasion of Chhatrapati Shivaji Maharaj's Coronation Festival, Nutan Maratha College, Jalgaon and Itihas Prabodhan Sanstha, Maharashtra organized the world's first All India Shri Shiv Charitra Sahitya Sammelan in the premises of Nutan Maratha College, Jalgaon, from 26the June to 29th June 2024.**

## Events pictures




**Chief guest Hon'ble Vijayraj Deshmukh and dignitaries in the program.**



**Statue of Chhatrapati Shivaji Maharaj in the exhibition**




**Exhibition of coins from Shiva era at Virgal.**



**Photographs of Armour during the Shivaji Maharaj Era.**





An exhibition of paintings of boats in armor during Shiva period.



Faculties of History Department along with Girl volunteers at the exhibition.



Faculties and students of History Department inspecting weapons of Shiva period at the exhibition.



Faculties and students of History Department inspecting and purchasing books in the Shivcharitra Sahitya Sammelan at the exhibition.



नवराष्ट्र

मराठ्यांचा इतिहास • जळगाव येथील तीन दिवसीय अखिल भारतीय श्री शिवचरित्र साहित्य संमेलनाचा समारोप

# शिवरायांचा खरा इतिहास मांडण्याची गरज : चव्हाणके

जळगाव, (वा.) शिवरायांच्या इतिहासात भेसळ करण्यात आली आहे. आपले जीवन शिवरायांनी हिंदवी स्वराज्य स्थापनेसाठी खर्ची घातले. त्यांचे अंगरक्षकही हिंदू होते त्यामुळे ते सेक्युलर नव्हते. छत्रपती शिवाजी महाराजांचा खरा इतिहास मांडण्याची आज गरज आहे. ती जबाबदारी शिवसाहित्यीकांची आहे. असे प्रतिपादन सुदर्शन न्यूजचे सुरेश चव्हाणके यांनी केले. अखिल भारतीय श्री शिवचरित्र साहित्य संमेलनाच्या समारोपप्रसंगी ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर नागपूरचे गादीपती श्रीमंत मुधोजीराजे भोसले, केदार फाळके, पीपल्स बँकेचे अनिकेत पाटील, डॉ. केतकी पाटील, किरण बच्छाव, भारती साठे आदी उपस्थित होते. यावेळी आयोजन समितीचे प्राचार्य एल. पी. देशमुख, रविंद्र पाटील, भारती साठे, शंकर जाधव यांचा शस्त्र प्रदर्शनकार मावळचे रवींद्र जगदाळे यांनी शिवप्रतिमा देवून सन्मान केला. खानदेश नसून कान्हदेश

साहित्य संमेलनातून आपले मत तयार होते. आपण या संमेलनातून काय संकल्प करणार? असा सवाल विचारत आपला परगणा हा खानदेश नसून कान्हदेश आहे. सरकारच्या गझेटमध्येही तसे असायला हवे, असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

## जगन्नाथ यात्रा भोसलेंची देणगी

ओडीसा येथील जगन्नाथ रथयात्रा ही तत्कालीन मुस्लीम शासकांनी बंद पाडली. ती संघर्ष करून पुन्हा सुरु करण्याचे काम नागपूरच्या भोसले यांनी केले. त्या जगन्नाथ मंदिराचा जीर्णोद्धार केला. तेथील समुद्रातील सेतूचे काम भोसल्यांनी केले असल्याचे त्यांनी सांगितले.

## खान हे इस्लामी आडनाव नाही

खान हे इस्लामी आडनाव नाही. मंगोल खानच्या आडनावावरून ते घेतले गेले. मंगोल खान हा मुस्लीम नसल्याचे सांगून त्यांनी त्या आडनावाबाबत बॉलीवुड मधील खान बंधुंनाच आवाहन केले.

## ऐतिहासिक साहित्याची जपणूक आवश्यक

नुकतीच नालंदा येथील विद्यापीठाला नवी इमारत पंतप्रधानांकडून देण्यात आली. इस्लामी शासकांकडून नालंदा विद्यापीठ जाळण्यात आले होते. त्यात ४ लाख महत्वाचे साहित्य जाळण्यात आले. सध्या आर्टीफिशीयल इंटलीजन्सचा जमाना आहे. त्यावर विधर्मीचे प्रभुत्व आहे. त्यामुळे इंटरनेटवर असलेले साहित्य ते एका क्षणात नाहीसे करु शकतात. त्यामुळे आपल्या ऐतिहासिक साहित्याची जपणूक केली पाहिजे.

## तर लोकशाही संपेल

- भारत देशात जर हिंदू अल्पसंख्यांक झाले तर लोकशाही संपेल असे मत त्यांनी मांडले. मुस्लीम राष्ट्रात लोकशाही नाही.
- मात्र भारतात जोपर्यंत शिवरायांचा मावळा आहे तो पर्यंत लोकशाहीला धोका नसल्याचे त्यांनी सांगितले.
- तसेच अशा संमेलनाची गरज असून संमेलनाच्या माध्यमातून महाराजांचा इतिहास कळेल तो महाराष्ट्रापुरता मर्यादित न राहता जगाला कळावा यासाठी हे संमेलन दिल्लीत व्हावे. अशी इच्छा त्यांनी आयोजकांकडे व्यक्त केली.
- सध्या सुरु असलेल्या धर्मांतरणाबाबत सत्ताधाऱ्यांना जाब विचारला पाहिजे. महाराष्ट्रात जातीयवाद फोफावला आहे. शेवटी अठरापगड जातींना घेवून महाराज लढले.
- एकसाथ जुटोगे तो जितोगे. जातीयोमे बटोगे तो तुटोगे असा सल्लाही त्यांनी यावेळी दिला. आभार प्रदर्शन प्राचार्य एल. पी. देशमुख यांनी केले. त्यानंतर संमेलनाचा समारोप झाला.

Nashik Edition
Jun 30, 2024 Page No. 7
Powered by: erelego.com

Refe- Daily Navarashtra Newspaper, Date-20th June,2024